## - शिर्डी - हैद्राबाद  मार्गावर एस.टी.ची वातानुकुलित व्होल्वो - शिवनेरी सेवा -

**<u>मुंबई, बुधवार, दिनांक १७ मार्च, २०१०</u>**

शिर्डी  आणि तुळजापूर या राज्यातील प्रसिध्द तिर्थक्षेत्रांना हैद्राबाद या ऐतिहासिक शहराशी जोडणाऱ्या रा.प. महामंडळाच्या शिर्डी - हैद्राबाद  या वातानुकुलित व्होल्वो - शिवनेरी सेवेचे उदघाटन मंगळवार, दि. १६ मार्च रोजी राज्याचे परिवहन मंत्री मा.ना. श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांचे शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी, शिर्डी संस्थानाचे अध्यक्ष मा.श्री. जयंतराव ससाणे व रा. प. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर उपस्थित होते.

शिर्डी  येथून सायंकाळी १८.०० वा. सुटणारी ही बस अहमदनगर, जामखेड, भूम, उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, जाहिराबाद मार्गे हैद्राबाद येथे दुस-या दिवशी सकाळी ६.१५ वा. पोहोचेल. हैद्राबाद येथून सायंकाळी २०.०० वा. सुटणारी बस दुस-या दिवशी सकाळी शिर्डी  येथे ८.१५ वा. पोहोचणार आहे. शिर्डी ते हैद्राबाद  हे सुमारे ६३३ कि. मी. चे अंतर १२ तास १५ मिनिटांत पार पाडण्यात येणार आहे.

शिर्डी - हैद्राबाद  प्रवास आरामदायी व सुखकर होण्यासाठी रा. प. महामंडळातर्फे बसमधील प्रवाशांना ब्लँकेट, मिनरल वॉटर मोफत पुरविण्यांत येणार आहे.

उपरोक्त सेवा सुरु करुन रा. प. महामंडळाने शिर्डी , तुळजापूर, व हैद्राबाद येथील प्रवाशांची मागणी पूर्ण केली असून या सेवेचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन रा. प. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांनी केले आहे.